जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४८८ दिनांक - १७/११/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक २, गुन्हे शाखा,पुणे शहर.

## लोणीकंद पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात दारुभट्टीवर कारवाई

मा.पोलीस आयुक्त सो, पुणे शहर यांनी पुणे शहरामध्ये विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने अवैध धंद्यावर प्रभावीपणे कारवाई करणेबाबत सर्व पोलीस ठाणे व गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे.

दिनांक १५/११/२०२४ रोजी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक २, गुन्हे शाखा, पुणे शहर कडील पोलीस अधिकारी व अंमलदार असे लोणीकंद पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्रात अवैध धंद्यावर कारवाई करणेकरीता गस्त करीत असताना पोलीस अंमलदार अमोल सरतापे व विनायक येवले यांना माहिती मिळाली की, माऊलाई चौक, वाळके वस्ती, पेरणे, ता. हवेली जि. पुणे येथे भट्टी लावुन गावठी हातभट्टीची दारु तयार करण्यात येत आहे. सदर ठिकाणी छापा टाकला असता तेथे ३५ लिटर तयार दारु व १६,५०० लिटर दारु तयार करणेचे रसायन व इतर साहित्य असा एकुण ८,४४,०००/- मुद्देमाल मिळुन आला. सदर बाबत दोन इसम यांचे विरुध्द लोणीकंद पोलीस स्टेशन, पुणे येथे गु.रजि.नं.१०८७/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ब)(क)(ड)(इ)(फ) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पुणे शहर श्री. निखील पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे २ श्री. राजेंद्र मुळीक यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदीपान पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक छबु बेरड, व पोलीस अंमलदार, राजेश अभंगे, अशोक आटोळे, राजेश लोखंडे, सुदेश सपकाळ, अमोल सरतापे, राहुल इंगळे, संदीप येळे, विनायक येवले, विक्रांत सासवडकर यांनी केली आहे.